




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com








■ वर्ष ७६ वे/अंक २५१ वा ■ ■ अमरावती, बुधवार दिनांक २९ एप्रिल २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर ९ वैशाख १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■








## भाजपकडून विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी ६ उमेदवारांची घोषणा



मुंबई दि. २८ : गेल्या अनेक दिवसांपासून विधान परिषदेच्या निवडणुकीची चर्चा सुरु आहे. विधान परिषदेच्या एकूण ९ जागांसाठी निवडणूक होत आहे. तर काँग्रेसमधून भाजपात प्रवेश करणाऱ्या प्रज्ञा सातव यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिल्यामुळे त्यांची जागा विधान परिषदेत रिक्त झाली आहे. भाजपकडून प्रज्ञा सातव यांना त्याच रिक्त झालेल्या जागेवर जी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे, त्या निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच विधान परिषदेच्या ९ जागांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. ९ जागांपैकी ५ जागांवर विजय मिळवण्याचं संख्याबळ भाजपकडे आहे. त्यामुळे ५ जागांसाठी भाजपकडून उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे.

विधान परिषदेत संधी मिळावी यासाठी भाजपमध्ये अनेक जण इच्छुक होते. अनेकांकडून आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न केले जात होते. अनेकांकडून पक्षश्रेष्ठींकडे जोरदार लॉबिंग केले जात होते. *(उर्वरित पान २ वर)*

## महिला आरक्षणाचे ध्येय मी पूर्ण करणारच : मोदी



वाराणसी दि. २८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या वाराणसी दौऱ्यात 'नारी शक्ती वंदन' संमेलनाला संबोधित करताना महिलांच्या सक्षमीकरणाबाबत मोठा निर्धार व्यक्त केला. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण मिळवून देणे हे आमचे सर्वोच्च ध्येय आहे आणि मी हे ध्येय पूर्ण करूनच राहणार, अशा शब्दांत मोदींनी महिलांना आश्वस्त केले. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते वाराणसीत सुमारे ६,३५० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली.

आपल्या भाषणाची सुरुवात करताना पंतप्रधान म्हणाले की, आमची काशी ही माता श्रृंगार गौरी, अन्नपूर्णा, विशालाक्षी आणि गंगा मातेच्या दिव्य शक्तींची भूमी आहे. आज या समागमाला माता-भगिनींनी उपस्थित राहून या प्रसंगाला अधिक दिव्य बनवले आहे. काशीचा खासदार आणि देशाचा पंतप्रधान म्हणून मला देशहिताचे मोठे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. यावेळी त्यांनी लोकसभा आणि विधानसभेत ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला. *(उर्वरित पान २ वर)*

## पश्चिम बंगालमध्ये अंतिम टप्प्यासाठी आज मतदान

कोलकाता दि. २८ : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्यासाठी १४२ जागांवर आज राज्यातील विविध मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडत आहे. संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या या निवडणुकीत सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांनी प्रतिष्ठेची लढाई उभी केली असून, शेवटच्या टप्प्यात मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने झुकतो याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अंतिम टप्प्यात अनेक महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये मतदान होत असून, राज्य निवडणूक आयोगाने मतदान शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. केंद्रीय सुरक्षा दलांच्या तुकड्या संवेदनशील भागात तैनात करण्यात आल्या आहेत.

या निवडणुकीत बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, महिला सुरक्षा, शेतकरी प्रश्न, उद्योगधंदे आणि कायदा-सुव्यवस्था हे प्रमुख मुद्दे ठरले आहेत. सत्ताधारी पक्षाने विकासकामांच्या जोरावर मत मागितले असून, विरोधकांनी भ्रष्टाचार आणि प्रशासनातील अपयश यावर सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात सर्व प्रमुख नेत्यांनी *(उर्वरित पान २ वर)*

## मुलींना वाचविण्यासाठी वडिलांचीही नदी पात्रात उडी; नदीवर कपडे धुवायला गेलेल्या तिघांचा मृत्यू

चंद्रपूर दि. २८ : कपडे धुण्यासाठी वर्धा नदी नदीवर गेलेल्या तिघांचा वर्धा नदीच्या पात्रात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. चंद्रपूर तालुक्यातील धानोरा गावाजवळ असलेल्या वर्धा नदीच्या घाटावरील ही घटना असून या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली आहे. मृतकांमध्ये राजू कोडापे (४०), त्यांची मुलगी अर्पिता कोडापे (१२) आणि भाची प्रियांका मडावी (१४ वर्षे) यांचा समावेश आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी नदी पात्राकडे धाव घेतली. त्यानंतर, पोलीस आणि प्रशासनाला माहिती देण्यात आली असून बुडालेल्यांसाठी शोधमोहिम राबविण्यात येत आहे.

पुण्यातील जुन्नर येथे आजच शेततळ्यात बुडून दोन मुलांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली होता. आता, चंद्रपूर जिल्ह्यातील वर्धा नदीवरही तिघांचा बुडून मृत्यू झाला आहे. आज दुपारच्या दरम्यान ६ ते ७ जण कपडे धुण्यासाठी गेले होते. त्यावेळी, मृतकांपैकी दोन मुली आंघोळ करत असताना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे अचानक त्या बुडू लागल्या, त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात वडिल राजू कोडापे यांनीही नदीपात्रात उडी घेतली, मात्र त्यांचाही मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच घुग्घुस पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून स्थानिक मच्छिमार आणि बचाव पथकाच्या मदतीने शोधमोहीम हाती घेतली आहे. मात्र, मृतदेहांचा अद्याप शोध लागलेला नाही. संध्याकाळ झाल्यामुळे आज शोधमोहीम थांबवण्यात आली असून उद्या सकाळी पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात येईल, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. मात्र, सायंकाळी उशिरापर्यंत ग्रामस्थ व नातेवाईकांनी नदी पात्राजवळ गर्दी केली होती.

## शेततळ्यात बुडून दोन चिमुकले दगावले

पुणे दि. २८ : खेळता खेळता मृत्यूने घाला घातल्याची एक भीषण घटना पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील बल्लाळवाडी येथे घडली आहे. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दोन चिमुकल्यांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बल्लाळवाडी येथील गाडेकर यांच्या शेतात असलेल्या शेततळ्यापाशी ही मुले खेळत होती. खेळत असताना त्यांचा अंदाज चुकला आणि ती तळ्यात पडली. बराच वेळ मुले घरी न आल्याने शोधाशोध सुरू झाली असता ही धक्कादायक बाब उघडकीस आली. मृत मुलांची आडनावे पवार आणि नवले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. तत्काळ पोलीस आणि स्थानिक रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. रेस्क्यू टीमने शर्थीचे प्रयत्न करून दोन्ही मुलांचे मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे बल्लाळवाडी परिसरात नागरिकांकडून हळहळ *(उर्वरित पान २ वर)*

### माहोल....

बंगालमध्ये आज मतदान




स्पीड दोघांचाही जबरदस्त शेवटी जिंकणार कोण?

## राज्यात व्यवसाय करायचा असेल तर मराठी येणे आवश्यकच : प्रताप सरनाईक



मुंबई दि. २८ : मराठी शिकण्याची तयारी दर्शविणाऱ्या चालकांना संधी देणे ही राज्याची परंपरा आहे; मात्र नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. तसेच महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल, तर मराठी भाषा येणे आवश्यक आहे, ही भूमिका सर्वांनी मान्य केली आहे, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्टपणे सांगितले. प्रताप सरनाईक पत्रकार परिषदेत बोलत होते.

राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी परिवहन विभागाने १ मे ते १५ ऑगस्टदरम्यान विशेष पडताळणी मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेचे नेतृत्व अतिरिक्त परिवहन आयुक्त रवींद्र गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीकडे सोपविण्यात आले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत सर्व संघटनांनी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. राज्यातील सर्व ५९ आरटीओंना १ मेपासून विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून, या अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या चालकांवर कडक कारवाई *(उर्वरित पान २ वर)*

## पेट्रोल-डिझेलच्या गाड्या बंद होणार? नितीन गडकरींच्या विधानानंतर चर्चांना उधाण



नवी दिल्ली दि. २८ : अमेरिका-इराण युद्धामुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम झाला होता. इंधन पुरवठा सुरळीत नसल्याने अनेक पेट्रोल पंप बंद पडली होती. इंधनाचा पुरवठा खंडीत झाल्याने देशभरात मोठा गोंधळ उडाला होता. आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या विधानामुळे पेट्रोल-डिझेल इंधनाचे वाहने बंद होणार? या चर्चाला उधाण आले आहे.

पेट्रोल-डिझेलवर धावणाऱ्या वाहनांचे भविष्य नाहीये, असे विधान केंद्रीय रस्ता वाहतूक आणि राजमार्ग मंत्री नतीन गडकरींनी केले होते. त्यांच्या विधानानंतर वाहने बंद होण्याच्या चर्चांना उधाण आले आहे. नितीन गडकरींनी एका कार्यक्रमात पर्यायी इंधनाच्या समर्थनात बोलताना पेट्रोल-डिझेलच्या वाहनांबाबत विधान केलं होतं.

ऑटोमोबाईल उद्योगाला इतर पर्यायी इंधनावर धावणाऱ्या वाहने निर्माण *(उर्वरित पान २ वर)*






### तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ४५.४ |
| अकोला | - | ४५.२ |
| बुलढाणा | - | ४२.३ |
| ब्रह्मपुरी | - | ४३.४ |
| चंद्रपूर | - | ४४.८ |
| गडचिरोली | - | ४४.० |
| गोंदिया | - | ४२.२ |
| नागपूर | - | ४४.४ |
| वर्धा | - | ४५.० |
| वाशिम | - | ४३.६ |
| यवतमाळ | - | ४४.० |
| भंडारा | - | ४२.० |

## विदर्भात १ मे पर्यंत पावसाळी ढग; पारा खाली येणार

नागपूर दि. २८ : हवामान विभागाच्या अंदाजानुसार महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याप्रमाणे विदर्भातही काही जिल्ह्यात आकाश अवकाळीच्या ढगांनी व्यापले आहे. २९ एप्रिल ते १ मे या काळात ४० ते ५० किमी वेगाने वाहणारे वादळी वारे, विजांचा कडकडाट व ढगांच्या गर्जनेसह काही ठिकाणी तुरळक व गारपीटीचा पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तापमान २ ते ३ अंशाने घटून उकाड्याचा त्रास किंचित कमी होईल, असा अंदाज आहे.

अंदाजानुसार मंगळवारीच विदर्भातील बहुतेक जिल्ह्यावर अवकाळीचे ढग जमा झाले आहेत. त्यामुळे तापमानात किंचित घट झाली, पण अनेक दिवसांपासून तीव्र ताप सहन करणाऱ्या जिल्ह्यांना त्यातून काहीच दिलासा मिळाला नाही. ४६ अंशाच्या वर गेलेल्या तीन जिल्ह्यात तापमान ४५ वर आले आणि *(पान २ वर)*

## भारतावर 'सुपर एल निनो'चे महाभयंकर संकट

नवी दिल्ली दि. २८ : हवामान तज्ज्ञ आणि संशोधकांनी एक गंभीर इशारा दिला आहे. भारतात या वर्षी सुपर एल निनोचे संकट येण्याची शक्यता आहे. हे संकट खरंच आले तर आपल्याकडे उष्णता वाढू शकते. तसेच पावसाळ्यात पुरेसा पाऊस न पडण्याची भीती आहे. त्यामुळे दुष्काळासारखे महाभयंकर संकट भारतावर येऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याआधी २०१५-१६ साली असेच संकट आले होते. तेव्हा भारतात अनेक ठिकाणी दुष्काळासारखी स्थिती निर्माण झाली होती.

सुपर एल निनोमुळे पृथ्वीच्या वातावरणीय चक्रात मोठे बदल होतात. प्रशांत महासागरात पाण्याच्या पृष्ठभागाचे तापमान खूप वाढते. हे तापमान २ अंश सेल्सिअस जरी वाढले तरी त्याचा संपूर्ण देशावर *(पान २ वर)*

## स्थानिक स्वराज्य निवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय; विरोधकांचा सुपडासाफ

अहमदाबाद दि. २८ : गुजरातमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपने जोरदार मुसंडी मारली असून विरोधकांचा सुपडासाफ केला आहे. १५ महापालिकांवर भाजपने झेंडा फडकवत काँग्रेस आणि आम आदमी पक्षाचा मोठा पराभव झाला आहे. गुजरातमध्ये २६ एप्रिल रोजी १५ महानगरपालिका, ८४ नगरपालिका, ३४ जिल्हापंचायती आणि २६० तालुका पंचायतीसाठी मतदान पार पडले. पुढच्या वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या निकालाकडे विधानसभेची नांदी असल्याचे बोलले जात आहे.

अहमदाबाद महानगपलिकेत भाजपने घवघवीत यश मिळवत १९२ पैकी १५८ जागा जिंकून पक्षाने गुजरातच्या या सर्वात मोठ्या शहरात आपले वर्चस्व आणखी मजबूत केले आहे. तर सूरत महानगरपालिकेत भाजपने १२७ पैकी ११५ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला आहे. आम आदमी पक्षाला केवळ चार जागांवर समाधान मानावे लागले तर काँग्रेसने एक जागा जिंकून पाच वर्षानंतर आपले खाते उघडले.

३४ जिल्हा *(उर्वरित पान २ वर)*